नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३१४ Issue - 314 | वार बुधवार दि. २ एप्रिल २०२५ Blow- Wednesday Date 2 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये 'बाईक टॅक्सी' धावणार

### धोरणास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता; २० ते ५० वर्ष वयोगटातील चालकांनाच बाईक टॅक्सी सेवा देता येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : राज्यात नागरिकांना नाविन्यपूर्ण परिवहन सेवेच्या सुविधा देण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रमांची अंमलबजावणी करीत आहे. याअंतर्गत नागरिकांना सुलभ परिवहन सेवा मिळण्यासाठी बाईक टॅक्सीला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार असून याबाबतच्या धोरणास राज्य मंत्रिमंडळाच्या सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. रस्त्यावरील वाहनसंख्या कमी होण्यासाठी खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायालासुद्धा शासनाने मान्यता दिली आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कायद्यांतर्गत योग्यता प्रमाणपत्र, विधीग्राह्य परवाना व विमा संरक्षण बंधनकारक असणार आहे. बाईक टॅक्सीच्या प्रवासी भाड्याचे दर हे संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील.

बाईक टॅक्सीमुळे कमी खर्चात प्रवासासाठी सुलभ पर्याय उपलब्ध होणार आहे. यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य राहणार आहे. या धोरणातंर्गत केवळ परिवहन संवर्गातील इलेक्ट्रीक बाईक टॅक्सीच धावणार आहेत. या योजनेमुळे नागरिकांना स्वस्त प्रवासाच्या पर्यायासह 'लास्ट माईल कनेक्टिव्हीटी'चा पर्याय उपलब्ध होणार आहे. यामुळे शहरातील प्रदूषण व वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ कमी होण्यास मदत होणार असून नवीन रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. केवळ २० ते ५० वर्ष वयोगटातील चालकांनाच बाईक टॅक्सी सेवा देता येणार आहे. तसेच यामध्ये महिला प्रवाशांना महिला चालकाचा पर्याय निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे.

## गुजरातच्या बनासकांठातील फटाका कारखान्यात भीषण स्फोट; १८ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गांधीनगर : गुजरातच्या बनासकांठातील फटाका कारखान्यात भीषण स्फोट झाल्याची बातमी समोर आली. ज्यामध्ये १८ पेक्षा अधिक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. बॉयलर फुटल्याने ही आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. घटना घडली त्यावेळी कारखान्यात ३० कामगार काम करत होते. या कारखान्याबाबतीत धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार त्याठिकाणी कोणता कारखाना नाहीतर केवळ गोदामसाठी लायसंस देण्यात आले होते. पण या फटाक्याच्या साठा करण्याच्या गोदाममध्ये मात्र अनधिकृतपणे फटाके बनवले जात होते.



पोलिसांच्या माहितीनुसार, सकाळी १० वाजता जेव्हा ही भीषण दुर्घटना घडली तेव्हा त्या गोदामात तेथील मजूर आपले काम सुरु करतच होते आणि अचानक स्फोट झाला. या स्फोटात इमारतीचे छताचा एक भाग उडाला. स्फोटामुळे २५ पेक्षा अधिक लोक उडून जमिनीवर पडले. त्यातच छत देखील त्यांच्या अंगावर कोसळले. परिणामी १८ पेक्षा अधिक लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. तर आणखी काहीजण अद्याप ढिगाऱ्याखाली दबले गेले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, डीसा शहरात झालेल्या या अपघातावेळी त्या कारखान्यात पुरुष, महिला आणि मुलांसह ३० हून अधिक लोक उपस्थित होते. बनासकांठाचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, एक भीषण असा स्फोट झाला. या स्फोटाचा आवाज दूरपर्यंत ऐकू आला. या अपघातात गोदामाचा संपूर्ण स्लॅब कोसळला आहे. यामध्ये चार ते पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. ज्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

डिसाच्या उपविभागीय दंडाधिकारी म्हणाल्या, स्फोटामुळे कारखान्यात भीषण आग लागली. यामुळे एकामागून एक स्फोट झाले आणि छत कोसळले. गोदामातून कारखान्यात रूपांतरित झालेल्या या इमारतीत फटाके बनवेल जात होते. यावेळी एखादा फटाका जमिनीवर पडला आणि त्यामुळेच ही आग फोफावली, असा संशय आहे. यामुळे इतर फटाक्यांनीही पेट घेतला. पोलिसांनी सांगितले की, काही लोक त्यांच्या कुटुंबासह याच आवारात राहत होते, ते देखील या स्फोटाचे बळी ठरले.

## बुलडोझर कारवाई प्रकरणी युपी सरकारला नुकसान भरपाईचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वातील भाजपाचं सरकार सत्तेत आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची भूमिका घेतल्याचं अनेकदा पाहायला मिळतं. मात्र, गेल्या काही दिवसांपासून उत्तर प्रदेशातील गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात येत असल्यामुळे योगी आदित्यनाथ यांचं सरकार चांगलंच चर्चेत आहे. अनेक गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात आल्याचंही पाहायला मिळालं. आता एका प्रकरणातील बुलडोझर कारवाईवरून सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला चांगलंच फटकारलं आहे.

प्रयागराजमधील एक वकील, एक प्राध्यापक आणि इतर काहींची घरे २०२१ मध्ये पाडल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उत्तर प्रदेश सरकार आणि प्रयागराज विकास प्राधिकरणावर चांगलेच ताशेरे ओढले. तसेच ही कारवाई बेकायदेशीर आणि असंवेदनशील असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. अशा प्रत्येक प्रकरणात पुढील ६ आठवड्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला दिले आहेत. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की, देशात कायद्याचं राज्य आहे आणि कोणत्याही नागरिकाचं निवासी घर किंवा बांधकाम अशा प्रकारे पाडलं जाऊ शकत नाही.



## संपादकीय....

### रोजगाराच्या संधी

राज्यात नागरिकांना नाविन्यपूर्ण परिवहन सेवेच्या सुविधा देण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रमांची अंमलबजावणी करीत आहे. याअंतर्गत नागरिकांना सुलभ परिवहन सेवा मिळण्यासाठी बाईक टॅक्सीला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार असून याबाबतच्या धोरणास राज्य मंत्रिमंडळाच्या सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. रस्त्यावरील वाहनसंख्या कमी होण्यासाठी खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायालासुद्धा शासनाने मान्यता दिली आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कायद्यांतर्गत योग्यता प्रमाणपत्र, विधीग्राह्य परवाना व विमा संरक्षण बंधनकारक असणार आहे. बाईक टॅक्सीच्या प्रवासी भाड्याचे दर हे संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येतील. बाईक टॅक्सीमुळे कमी खर्चात प्रवासासाठी सुलभ पर्याय उपलब्ध होणार आहे. यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य राहणार आहे. या धोरणातंर्गत केवळ परिवहन संवर्गातील इलेक्ट्रीक बाईक टॅक्सीच धावणार आहेत. या योजनेमुळे नागरिकांना स्वस्त प्रवासाच्या पर्यायासह 'लास्ट माईल कनेक्टिव्हीटी'चा पर्याय उपलब्ध होणार आहे. यामुळे शहरातील प्रदूषण व वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ कमी होण्यास मदत होणार असून नवीन रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. केवळ २० ते ५० वर्ष वयोगटातील चालकांनाच बाईक टॅक्सी सेवा देता येणार आहे. तसेच यामध्ये महिला प्रवाशांना महिला चालकाचा पर्याय निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे.

# रिझर्व बँक ऑफ इंडीयाचे जनक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महात्मा गांधी देशाच्या संविधान निर्मितीच्या अगोदर आपल्या सहकार्यांशी बोलताना म्हणतात, भारत देशाचे संपूर्ण अर्थकारण, राजकारण, समाजकारण, इतिहास, भाषावार प्रांतरचना विश्लेषण, भौगोलिक रचना, भारतीय व्यापार, शेती, भारतीय कामगारांचे प्रश्न या विविध बाबींची सखोल माहिति जर कोणाला असेल तर ते डॉ. आंबेडकर होते. संविधान निर्मितीसाठी त्यांच्यासारखा विद्वान पंडित कोणी नाही, म्हणून कोणत्याही परिस्थितीत डॉ. आंबेडकरांना संविधान समिती मध्ये निवडून आणा. आर्थिक विकासासंदर्भात डॉ. आंबेडकर यांच्या मते, अल्पभूधारकांवर आधारित भारतीय शेतीची उत्पादकता व उत्पन्न कमी असण्याचे मुख्य कारण शेतीमधील अल्प भांडवली गुंतवणूक हे आहे. फक्त शेतीच नव्हे तर कामगारांचे आर्थिक धोरण यावर सुद्धा त्यांनी विस्तृत विचार मांडणी केली आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतातील संपुर्ण घटकांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला होता. त्यात भारतीय अर्थव्यवस्था व त्यावरील समस्यांचे उपाय यावर त्यांनी जागतिक दर्जाच्या तीन पदव्या प्राप्त केल्या होत्या.

अर्थशास्त्रावर तीन विद्वत्तापूर्ण प्रबंध कोलंबिया (अमेरिका) व लंडन विद्यापीठाला एम.ए. पीएचडी व डीएसस्सी साठी सादर केले आणि विशेष म्हणजे पुढे तीनही प्रबंध पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात आले.



१) ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि वित्तप्रणाली : १७९२ ते १८५८ या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचा ऐतिहासिक आढावा, ज्यात ब्रिटिश सरकारच्या अधिपत्याखाली भारतीयांना कशा हालअपेष्टा भोगाव्या लागल्या त्यावर परखड भाष्य डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

२) ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती : यामध्ये प्रामुख्याने १८३३ ते १९२१ या कालखंडातील ब्रिटिश भारतातील केंद्र शासन व घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंधाचे चिकित्सक विश्लेषण जे केंद्र आणि राज्याच्या आर्थिक संबंधाच्या बाबतीत महत्वपूर्ण आहे.

३) भारतीय रुपयाचा प्रश्न:उद्गम आणि उपाय : या प्रबंधात भारतीय अर्थव्यवस्थेच्या घडीसाठी उपाययोजना बाबतीत अतिशय सूक्ष्म आणि चिकित्सक पद्धतीने मांडणी केली आहे. 'भारतासाठी सुयोग्य चलन पद्धती कोणती?' आर्थिक धोरणे या व त्या काळाच्या गहन प्रश्नांची चर्चा करणारा अत्यंत मौलिक असा अर्थशास्त्रीय दस्तावेज आहे.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या स्थापनेत नेमके काय योगदान आहे हे महत्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास आणि सुधारणा करण्यासाठी १९२४-२५ मध्ये ब्रिटिश सरकारने रॉयल समिती नेमली होती. त्यालाच हिल्टन यंग कमिशन असेही म्हटले जाते. या समितीकडून अर्थव्यवस्थेवर बोलण्यासाठी डॉ. आंबेडकरांना आमंत्रित केले होते आणि विशेष म्हणजे त्या समितीतील प्रत्येक सभासदांकडे द प्रॉब्लम ऑफ रूपी हे पुस्तक होते. भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी प्रत्येक सभासद हा या पुस्तकाचा संदर्भ म्हणून उपयोग करू पाहत होता, हे पाहून डॉ. आंबेडकर आनंदी झाले. डॉ. आंबेडकरांनी या समितीसमोर भारतीय चलनात असलेल्या अडचणी व त्यावरील उपाय, बँकिंग कार्यपद्धती कशी असावी, वित्तीय धोरण, चलनाचा मापदंड काय असावे शेती व्यवसाय, आर्थिक धोरण, जमीनदारी पद्धती, जमीन कर या सर्वांचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, सर्वात महत्वाचे चलन विनिमय व्यवस्थेत 'सोने'हा मापदंड मानला पाहिजे असे त्यांनी ठासून सांगितले. पहिल्या महायुद्धानंतर १९३५ साली ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेली भारतीय अर्थव्यवस्था सुरळीत चालू राहावी, म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापन करण्याचे ठरले.

या समितिचा तपशील लक्षात घेऊन बँक स्थापन करण्यात आली. डॉ बाबासाहेबांनी लिहलेल्या वरील तीनही पुस्तक प्रबंधाचा उपयोग हा 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या' स्थापनेचा पाया ठरला आणि ही मध्यवर्ती बँक अस्तित्वात आली. डॉ. आंबेडकरांनी सुचवलेले मार्गदर्शक तत्वे आणि कार्यप्रणाली यावर आजही ही बँक तटस्थ उभी आहे. १ एप्रिल १९३५ मध्ये बँकेची स्थापना करण्यात आली खरी मात्र १९४९ मध्ये ही खऱ्या अर्थाने भारतीयांच्या ताब्यात घेण्यात आली. बाबासाहेब हे किती महान अर्थशास्त्रज्ञ होते हे यावरून लक्षात येईल. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ साली ५०० व १००० रूपयांच्या नोटांचे विमुद्रीकरण केले. ही मूळ संकल्पना डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या द प्रॉब्लम ऑफ रूपीया पुस्तक प्रबंधामधून घेण्यात आली होती. सेवायोजन कार्यालयांची स्थापना, कौशल्य विकासाची पायाभरणी याचे संपूर्ण श्रेय डॉ. आंबेडकरांना जाते. त्यांच्यामुळेच ही देणगी भारताला लाभलेली आहे.

भारताचे महान अर्थशास्त्रज्ञ डॉ.अमर्त्य सेन ज्यांना अर्थशास्त्रामध्ये 'नोबेल पारितोषिक'मिळाले आहे, असे म्हणतात डॉ.आंबेडकर हे अर्थशास्त्रात माझे वडील आहेत, त्यांच्या ऐवढा जागतिक कीर्तीचा महान अर्थशास्त्रज्ञ होणे नाही. लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स, विद्यापीठात डॉ. आंबेडकरांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्याचबरोबर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन'देखील चालू करण्यात आले आहे. आजच्या दिनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्यास विनम्र अभिवादन !!!

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA



# तांबरवाडी येथे परम पुज्य लालगीर महाराज भजनी मंडळाच्या वतीने गुढीपाडवा व नववर्षाचे जल्लोषात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील तांबरवाडी येथे गुढीपाडवा व नव वर्षानिमीत्त तांबरवाडी येथील ग्रामदैवत परम पुज्य लालगिर महाराज यांच्या मठामध्ये महिलांच्या वतिने भक्ती संध्या कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता! कार्यक्रमात महिलांनी लालगीर महाराज मठामध्ये पारंपारीक गुढी उभारुन गुढीची पुजा करत एकमेकींना पेढे भरवत महिलांनी पारंपारीक नउवारी साडी परीधान करुन डोक्यावर फेटे बांधुन मठामध्ये भजन, हरिपाठ, पाउल खेळत, फुगडीचा आनंद घेतला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष मनुन सौभाग्यवती रेखा मोहनराव पाटील यांना आमंत्रीत करण्यात आले होते यावेळी लालगीर महाराज महिला भजनी मंडळाच्या अध्यक्षा छायाबाई बिराजदार, मंगल बोडके. ललाताई बिराजदार, नंदा बाजुळगे, सुमन बोडके, करुना बिराजदार धोंडाबाई सुर्यवंशी सह शेकडो महिलांनी हा गुढीपाडवा नववर्ष मोठ्या उत्साहात साजरा केला.

# तृतीयपंथीयांच्या हक्कांचेही होणार संरक्षण : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासन राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. यासाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना ही करण्यात आली आहे. तृतीयपंथी यांच्या हक्कांचे संरक्षण अधिक सक्षमतेने आणि प्रभावी होण्यासाठी या मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे, याबाबतचा निर्णय घेण्यात आला

## तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी कल्याण मंडळाची पुनर्रचना

असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

या संबंधीच्या निर्णयाची प्रत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते तृतीयपंथी समुदायाच्या प्रतिनिधींना सह्याद्री अतिथीगृह येथे देण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीय समुदायाच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्य यासंदर्भातील विविध योजना राबवण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे तृतीयपंथीय समुदायाला अधिक सक्षम आणि न्याय्य प्रतिनिधित्व मिळेल, तसेच त्यांचे हक्क आणि कल्याण अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करता येईल.

सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले, सन २०१८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या



या मंडळाच्या संरचनेत बदल करून सुधारित स्वरूपात नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १३ अशासकीय सदस्यांची नियुक्ती रद्द करून त्याऐवजी नव्या सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी तृतीयपंथीयांसाठीचे धोरण - २०२४, ११ मार्च २०२४ रोजी जाहीर करण्यात आले होते. या धोरणानुसार राज्यस्तरीय मंडळाच्या संरचनेत सुधारणा करणे आवश्यक होते.

नव्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क संरक्षण आणि कल्याण मंडळाचे अध्यक्ष असतील. तसेच समाज कल्याण आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहेत. तृतीयपंथीय प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अशा अशासकीय सदस्यांचाही मंडळात समावेश करण्यात आला आहे.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १३ विद्यार्थ्यांचे 'गेट' परीक्षेमध्ये उज्ज्वल यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तंत्रशिक्षणामध्ये सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील 'गेट' (ग्रॅज्युएट एप्टीट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंग) या परीक्षेमध्ये गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग या तिन्ही विभागातून १३ विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. 'गेट' या परीक्षेत प्रत्येक वर्षी स्वेरीचे विद्यार्थी चमकतात. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

राष्ट्रीय स्तरावरील 'गेट' या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या अंतर्गत आणि आय.आय.एस.सी. आणि आय.आय.टी. या उच्च तंत्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या 'गेट-२०२५' या परीक्षेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील अंतिम वर्षात शिक्षण घेणारे अमोल दत्तात्रय जाधव, गणेश राजाराम कचरे, तिसऱ्या वर्षात शिकणाऱ्या वैष्णवी विलास मस्के, अंतिम वर्षात शिकणाऱ्या तेजस्विनी





तानाजी निकम, जय बाळासाहेब जाधवर, कोमल शिवाजी कसबे आणि रोहिणी पांडुरंग बागल हे सात विद्यार्थी आणि अमोल दत्तात्रय जाधव यांचा कॉम्प्यूटर सायन्स विषयात ७४७ वा क्रमांक तर डाटा सायन्स या विषयात देखील त्यांनी यश संपादन केले आहे. त्यामुळे या गुणवत्ता यादीत अमोल दत्तात्रय जाधव यांना दुहेरी यश मिळाले आहे. कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील ८ विद्यार्थी, सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील भीमाशंकर राजशेखर तुकमल्ली, रोहन राजेश ताटीपामल, अभिषेक सुरेश निंबाळ व रवि अनिल मस्तूद असे ४ विद्यार्थी तर मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षातील रोहित अशोक तळेकर असे मिळून तिन्ही विभागातील एकूण १३ विद्यार्थी हे गेट परीक्षेत यशस्वी झाले. अत्यंत अवघड स्वरुपाच्या असणाऱ्या या परीक्षेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची आणि उच्च करिअरची दारे खुली होत असतात. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांचे विद्यार्थ्यांसाठीचे विकासात्मक धोरण, नियोजनात्मक मार्गदर्शन आणि उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने स्वेरीत 'गेट' परीक्षेची तयार करून घेतली जाते. यामध्ये प्रत्येक वर्षी विविध विषयांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित केले जातात. या व्यतिरिक्त 'डव्हान्सड टेक्निकल ट्रेनिंग'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अशा परीक्षांसाठी आवश्यक संपूर्ण तयारी करून घेतली जाते. वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या टेस्ट आणि त्यांचे विश्लेषण यामधून विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणातील अद्ययावत माहिती मिळते. त्यामुळे स्वेरीतील विद्यार्थ्यांना अशा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळते. या परीक्षेसाठी अत्यावश्यक असणारे सर्व स्टडी मटेरियल हे स्वेरीच्या नूतन इमारतीत असलेल्या मुख्य लायब्ररीमधून उपलब्ध करून दिले जाते. तसेच 'गेट ट्यूटर' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'गेट' संदर्भात अधिक माहिती मिळून परीक्षेच्या दृष्टीने सखोल तयारी करण्यास मदत मिळते. 'गेट' ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आय.आय.टी, एन.आय.टी. सारख्या संस्थांमध्ये प्रवेश मिळतो. त्याबरोबरच या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'पब्लिक सेक्टर' मधील कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराच्या आणि उच्चपदाच्या नोकरीसाठी संधी मिळतात. स्वेरीचे अभियांत्रिकी महाविद्यालय हे वार्षिक परीक्षांचे निकाल, प्लेसमेंट व प्रत्येक वर्षाची प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या या महत्वाच्या बाबीमध्ये कायम अग्रेसर राहिलेले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. स्वाती पवार, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. गेट परीक्षेत उज्वल यश मिळवलेल्या या विद्यार्थ्यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख यांच्यासह इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असणाऱ्या डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

# भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाच्या विकास कामाला लवकरच सुरुवात करणार : अण्णा बनसोडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोरेगाव भीमा/प्रतिनीधी : ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ हे शौर्याचे प्रतीक असून ०१ जानेवारी रोजी विजयस्तंभ स्मारकास अभिवादन करण्यासाठी लाखो भीमसैनिक अनुयायी येत असतात . महाराष्ट्र शासनाच्या वतीने भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाच्या विकास कामास लवकरच सुरू करण्यात येणार असून सामाजिक न्याय मंत्री मा.श्री. संजय शिरसाट यांनी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यापेक्षाही जास्तीचा निधी शासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विधानसभेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष आमदार श्री. अण्णा बनसोडे यांनी विजयस्तंभ येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

विधानसभेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आमदार श्री. अण्णा बनसोडे यांनी दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकास भेट देऊन पुष्पचक्र अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच त्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे समाधी स्थळ असलेल्या तुळापूर , वढु बुद्रुक येथील तसेच शूरयोद्धा गोविंद गोपाळ गायकवाड समाधीस्थळी भेट देऊन विनम्र अभिवादन केले .विजयस्तंभ येथे बार्टी संस्थेच्या वतीने त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, विजयस्तंभाची प्रतिकृती व भारताचे संविधान हे अड. गौरक्ष लोखंडे, श्री सुमेध थोरात, रामदास लोखंडे यांच्या हस्ते भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री. रामदास लोखंडे यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभ जागेबाबत उच्च न्यायालयात सुरु असलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणाची माहिती देऊन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री. सुनील वारे यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचा विकास आराखडा शासनास सादर केला असल्याचे सांगितले.

याप्रसंगी अनुसुचित जाती व जमाती आयोगाचे सदस्य अड. गौरक्ष लोखंडे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. सुमेध थोरात, राहुल कवडे, पेरणेच्या सरपंच श्रीमती उषा दशरथ वाळके, कोरेगाव भीमाचे सरपंच संदिप ढेरंगे, विस्तार अधिकारी मोरे, मंडल अधिकारी श्री. संदिप झिंगाडे, ग्रामपंचायत सदस्य सुनिल आवचर, साईनाथ वाळके, राजाभाऊ गवदे, भारतीय बौद्ध महासभेचे श्री. कोमल वासनिक, सुधाकर लोखंडे, ग्रामविकास अधिकारी श्री. रतण दवणे, किसन बिबे, शांताराम पाडळे, सदानंद फडतरे यांच्यासह भीमा कोरेगाव परिसरातील नागरिक आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### रिक्षाने दुचाकीस्वारास ठोकरले

सोलापूर : देगाव येथील बसवेश्वर येथे मंगळवेढा- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ओम हॉटेल समोर रिक्षाने दुचाकीला धडक दिल्याची घटना शुक्रवार (दि.२८) साडेआठ वाजता घडली. या प्रकरणी




नारायण प्रभाकर कुलकर्णी (वय ६४ रा. दमानी नगर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून रमेश राजाराम राठोड (रा. कोठे वस्ती, बसवेश्वर नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, मंगळवेढा-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बसवेश्वर नगर येथे ओम हॉटेल समोर रिक्षा चालकाने त्याच्या ताब्यातील रिक्षा (क्रमांक एम एच १३ ई एफ ३५८६) याने विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने रिक्षा चालवून दुचाकी (क्रमांक एम एच १३ डी एस ७३८१) या गाडीला धडक दिली. यात फिर्यादीस गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे असे फिर्यादीत नमूद आहे.

# पंढरपूर तालुक्यातील एकलासपूर गावची कन्या झाली महाराष्ट्र पोलीस उपनिरीक्षक

## गावात आनंदाचे वातावरण; सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील एकलासपूर गावातील कु. पल्लवी राजेश कवडे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (Mpsc) परीक्षेत उत्तीर्ण होत महाराष्ट्र पोलीस उपनिरीक्षक ( PSI) पीएसआय पदी घेऊन महाराष्ट्र मध्ये महिलांमध्ये दुतीय आली आहे तिच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण असून तिच्यावर अभिनंदन याचा वर्षाव होत आहे.



पल्लवीने आपल्या शालेय शिक्षणाची सुरुवात जिल्हा परिषद शाळा एकलासपूर येथे केली तर उच्च शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर मधून पूर्ण केली पुढे तिने पुढे तिथे जाऊन त्यांनी एमपीएससीचे क्लासेस लावले लहानपणापासून अभ्यासू आणि भिंती असलेल्या पल्लवीने अधिकारी होण्याची स्वप्न पाहिले होते आणि ते सत्यात उतरवण्याचे अथक मेहनत घेतली व त्यासाठी तिला तिच्या आई-वडील आजोबा यांचे सहकार्य लाभले.

एमपीएससी परीक्षेत तयारी करताना तिने नियमित अभ्यास स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक वर्ग शारीरिक तदृष्टी आणि मानसिक तयारी यावर विशेष भर दिला व ग्रामीण भागातील असूनही तिने आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले.

मोतीच्या यशाने संपूर्ण कुटुंबाचा अभिमान वाढवला आहे व तिच्या आई-वडिलांनी तिला शिक्षणासाठी सातत्याने पाठिंबा दिला गावातील लोकांनीही तिच्या भेटीचे कौतुक करून तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व तिच्या यशाची बातमी कळताच गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहत्ती शिक्षकांनी सांगितले की तिच्या जिने जिद्दीने चिकाटीने व मेहनतीने दाखवून दिले व जिद्दीने चिकाटीने कोणतीही गोष्ट अशक्य नाही असे सांगून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# डॉ. आशिष कदम यांची वैद्यकीय अधिकारी गट अ पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : अब्दुल लाट तालुका शिरोळ गावचे सुपुत्र डॉ. आशिष शिवाजी कदम यांची महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गात वैद्यकीय अधिकारी गट अ या पदावर सैनिक टाकळी तालुका शिरोळ येथे नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी समाजसेवक अर्जुन धुमाळे, विकी माने, कुबेर कदम, शिवाजी कदम, अमोल कदम, स्वराज निर्मळे, नामदेव निर्मळे, आदींनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# फॅमिली प्लॅनिंग सोलापूरच्या कर्मचाऱ्यांचे गर्भाशय कॅन्सर विरुद्ध लढणाऱ्या एच.पी.व्ही. व्हॅक्सिनेशनचे ट्रेनिंग संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : बदललेली जीवनशैली, अति प्रमाणात होत असलेला प्लास्टिकचा वापर, रसायुक्त फवारणी करून पीकविलेले अन्नधान्य, पालेभाज्या, सीजन नसताना येणारे फळे, फळे पिकवण्यासाठी वापरले जाणारे रसायने, अतितणाव, फ्रिजमध्ये साठवून ठेवलेले अन्नपदार्थ, अन्नपदार्थ पार्सल घेऊन जाण्यासाठी वापरले जाणारे प्लास्टिकच्या पिशव्या यांचा सर्रास वापर अशा विविध कारणांमुळे दिवसेंदिवस कॅन्सरचे प्रमाण वाढताना दिसत आहे. कॅन्सरविषयी मोठ्याप्रमाणात जनजागृती करणे, महिलांमध्ये होणाऱ्या गर्भाशय व स्तनाच्या कॅन्सर विषयी उघडपणे बोलले पाहिजे. सध्या गर्भाशयाचा कॅन्सर रोखण्यासाठी मुला मुलींना एच.पी. व्ही. व्हॅक्सिनेशन बाजारात आले आहे. सध्या ते महाग असले तरी ९ ते १४ वयोगटासाठी एच.पी. व्ही. व्हॅक्सिनचा पहिला डोस झाल्यानंतर सहा महिन्यानंतर दुसरा डोस, १५ ते २६ या वयोगटासाठी एकूण तीन डोस घेणे जरुरीचे आहे. पहिला डोस झाल्यानंतर, दोन महिन्यानंतर दुसरा डोस तर सहा महिन्यानंतर तिसरा डोस, २७ ते ४५ या वयोगटासाठी देखील एकूण तीन डोस घेणे जरुरीचे आहे. पहिला डोस झाल्यानंतर, दोन महिन्यानंतर दुसरा डोस तर सहा महिन्यानंतर तिसरा डोस घेतल्यास गर्भाशयाच्या कॅन्सर विरुद्ध यशस्वी लढा देऊ शकतो असे प्रतिपादन छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाच्या स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागाच्या, विभाग प्रमुख डॉ. विद्या तिरणकर यांनी केले.

ज्वेलेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड प्रकल्पांतर्गत फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या कर्मचाऱ्यांकरिता छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागाच्या ओ.पी.डी. मध्ये आयोजित एच.पी.व्ही. व्हॅक्सिनेशन ट्रेनिंग मध्ये मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

यावेळी ए.आर. टी. विभागाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेकर, एच.पी. व्ही. वॅक्सिंन - सर्वाव्याक कंपनीचे सोलापूर प्रतिनिधी वैभव पराडकर, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

यावेळी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, परिचारिका आशालता मस्के, रोजमेरी गायकवाड, सुकेशनी सोनकांबळे आधी कर्मचाऱ्यांनी एच.पी.व्ही. व्हॅक्सिनेशनचे ट्रेनिंग घेतले.

कार्यक्रमाचे स्वागत आकाश गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार आशालता मस्के यांनी मानले.

# अक्कलकोट शहरातील शाही ईदगाह मैदानावर रमजान ईदची सामुदायिक नमाज पठण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट शहरातील शाही ईदगाह मैदानावर अक्कलकोट शहर व ग्रामीण भागातील मुस्लिम बांधवांनी ईद -उल फित्र अर्थात रमजान ईदची सामुदायिक नमाज पठण करत मोठ्या उत्साहाने ईद साजरी केली.

नमाज पठण साठी सकाळी ८ :३० ला तमाम मुस्लिम बांधव ईदगाह मैदानात हजेरी लावत,ईदगाह येथे सामुदायिक नमाज पठण केली.

अक्कलकोट ईदगाह कमिटी कडून नमाज पठण करण्यासाठी आलेल्या मुस्लिम बांधवांना नमाज पटनासाठी उत्तम चटाया अंथरण्यात आले होते,

या वेळी मौलवी साहेब यांनी आपल्या भाषणात(खुतबा)मध्ये सांगितले कि मुस्लिम तरुणांनी



जुगार, मावा,गुटखा, दारू तसेच सोशल मीडियावरील असे कोणतेही पोस्ट,स्टेटस, रिलस शेअर फॉरवर्ड करू नका ज्यामुळे ज्यामुळे दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अश्या गोष्टी पासून दूर रहावे.

व आपल्या आई वडिलांची सेवा करावे, व आपआपसात प्रेम आणि भाईचारा प्रस्थापित करा असे यावेळी सांगितले.

एकमेकांनी प्रेमाने राहून या देशात शांतता व भाईचारा आबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे आवाहन केले.

आणि शेवटी मौलवी साहेब यांनी ईदच्या या पवित्र दिवशी आपल्या देशातील सामाजिक सलोखा, बंधुभाव, एकमेकांच्या धर्माबद्दल प्रेम,अधिकाधिक वृद्धिगत वाहवा आपल्या देशा मध्ये भाईचारा व विश्वशांतीसाठी अशी अल्लाकडे खास दुआ प्रार्थना करण्यात आली.

ईदऊल फितर अर्थात रमजान ईदची नमाज पठण झाल्यावर शाही ईदगाह येथे विविध राजकीय व सामाजिक नेते मंडळी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

या वेळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अशपाक भाई बळोरगी, रईस टिनवाला, महेश हिंडोळे, दिलिप भाऊ सिद्धे, शिवकुमार स्वामी,यांनी सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

तसेच अक्कलकोट पोलिस प्रशासनाकडून शाही ईदगाह मैदानावर ईद-उल फित्र अर्थात रमजान ईदची नमाज पठण झाल्यावर सर्व मुस्लिम बांधवांचे व लहान मुलांना उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी गुलाब देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिली.

# गौडगांव येथील श्री परमेश्वर यात्रा महोत्सव निमित्त उद्यापासून विविध धार्मिक कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : तालुक्यातील गौडगांव (खुर्द) येथील श्री परमेश्वर यात्रा महोत्सव निमित्त ३ एप्रिल रोजी श्री.म.नि.प्र. प्रभुशांतलिंग महास्वामीजी विरक्त मठ, हत्तीकणबस आणि श्री.ष.ब्र. शांतवीर शिवाचार्य महास्वामीजी, संस्थानमठ, चलगेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.



गौडगांव (खुर्द) ता. अक्कलकोट येथे गुरुवार ३ एप्रिल २५ रोजी सकाळी नऊ वाजत धर्मसभा कार्यक्रम होणार असून या प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट, कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले,श्री स्वामी समर्थ देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे यांची प्रमुख उपस्थितीत लाभणार आहे. तसेच याच दिवशी पहाटे श्री परमेश्वर लिंगास सामुहिक रुद्राभिषेक सहस्त्र बिलवार्चन व महाआरती होणार आहे. श्री वे. मु. चिदानंद स्वामी, श्री थे.मु. संतोष स्वामी, श्री वे.मु. इरण्णा नंदिकोल, वे.मु. रविराज मठपती, वे.मु. गंगाधर कळ्ळीमठ, श्री वे. मु. सिध्दलिंगच्या स्वामी सर्व पुज्य महास्वामीजी हस्ते सकाळी ठिक ९.०० वा. सुवासनिंचा ओठी भरणे कार्यक्रम होणार आहे. सायं. ४.०० वा. श्री वे. मु. नागय्या व. स्वामी यांच्या घरांपासून श्री परमेश्वर मंदिरापर्यंत श्री रिध्दी - सिध्दी नंदीध्वज धारक, सुभाष गल्ली, अक्कलकोट यांच्या सम्मुखातुन मिरवणूक संपन्न होईल. या कार्यक्रमास येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचा व्यवस्था करण्यात आला असून श्रीचे दर्शन आणि महाप्रसादाचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन एका पत्रकाद्वारे केले आहे.

**प्रथम क्रमांकाने भारतात उत्तीर्ण झाल्याबद्दल पंढरपूर शहर व जिल्ह्यातून शुभेच्छांच्या वर्षाव**

# राष्ट्रीय स्तरीय अबॅकस कॉम्पिटिशन स्पर्धा परीक्षेत पंढरपूर येथील स्वराज्य खंडागळे भारतात प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : पंढरपूर येथील कवडे अॅकॅडमी आयडियल प्ले एमएक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५ च्या या वर्षात घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरीय लेवल एमएक्स कॉम्पिटिशन स्पर्धा परीक्षेत पंढरपूर येथील आदर्श प्राथमिक शाळेतील विद्यार्थी स्वराज्य प्रताप खंडागळे हा भारतात पहिला आला आहे.

या अबॅकस स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेला विद्यार्थी हा स्वराज खंडागळे हा पंढरपुरातील नामांकित आदर्श प्राथमिक विद्यालयात शिक्षण घेत असून तो इयत्ता तिसरी या वर्गात शिकत आहे पंढरपूर येथील कवडे अॅकॅडमी या संस्थेने राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते व आदर्श प्राथमिक महाविद्यालयातील स्वराज्य खंडागळे हा विद्यार्थ्यांनी सहभागी घेऊन सहा मिनिटात १००




प्रश्न सोडवून हा स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झाला असून महाराष्ट्र राज्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे त्याबद्दल कवडे एमएक्स अॅकॅडमी आयडियल प्ले अबॅकस या संस्थेच्या वतीने त्यांना बक्षीस वितरण पारितोषिक समारंभ हा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या राज्यात प्रथम आलेल्या स्वराज्य खंडागळे हा व पालक यांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला या अगोदरही स्वराज्य खंडागळे यांनी सन २०२४ रोजी ही घेण्यात आलेल्या अबॅकस या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत राज्यात तिसरा क्रमांक मिळाला होता.

या कार्यक्रमाचे स्वागत उत्सुक म्हणून कवडे अॅकॅडमी संस्थेचे मालती कवडे व चैताली कवडे मॅडम व सर यांच्यासहसंस्थेतील पदाधिकारी उपस्थित होते स्वराज्य खंडागळे यांचे वडील प्रताप सिंह खंडागळे माडा येथील सहकारी साखर कारखान्यात शेती विभागात काम करत आहेत स्वराज्य खंडागळे हा मूळ संगेवाडी तालुका सांगोला येथील रहिवासी आहे या स्पर्धेत आदर्श प्राथमिक महाविद्यालयातील विद्यार्थी स्वराज्य खंडागळे यांनी भारत देशात प्रथमच क्रमांक पटकावून यश प्राप्त केल्याबद्दल आदर्श प्राथमिक महाविद्यालय मुख्याध्यापिका घंटे मॅडम, वर्ग शिक्षिका सोनाली देशपांडे मॅडम, श्री संत कोमाला सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अॅड धनाजीराव साठे, माढा नगरपरिर्तीच्या नगराध्यक्ष मीनल ताई साठे, वसंतराव काळे, सहकारी साखर कारखान्याची माजी संचालक तानाजी जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मुंबई राजाराम जाधव, पंढरपूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय सिद्धेवाडी तालुका पंढरपूर ते अध्यक्ष नितीन पाटील गुरुजी भोसेकर कम ग्रामपंचायतचे माजी सरपंच इंदोमती कोरके, कोरमाता सहकारी साखर कारखान्याची कार्यकारी संचालक झुंजार आजबे, मुख्य शेती अधिकारी शिंदे तसेच कारखान्यातील इतर अधिकारी व कर्मचारी यांनी यशाबद्दल फोन द्वारे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमास कवडे अॅकॅडमी संस्थेचे सर्व सहकारी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष सुभाष माने सर यांच्या अध्यक्षतेखाली झाला व वस्तुपिडन्स अँड डेव्हलपर्स संस्थापक अजित खंडारे, योगाभ्यासक अलिशा खंड्रे यांच्या संयुक्त यांच्या शुभहस्ते हा कार्यक्रम संपन्न झाला.**



# उगाव येथे नवनाथ महाराजांचा नाथ भंडारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील उगाव येथे गुरू नवनाथ पंथी संजय महाराज आहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सालाबाद प्रमाणे याही वर्षी नाथभक्त व समस्त ग्रामस्थ यांच्या सहकार्याने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून श्री नवनाथ भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रसंगी दुपारी ३ ते ६ नाथ काठीची सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून. संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत उपस्थित सर्व भाविकभक्तांसाठी भंडारा महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे तसेच.रात्री ८ ते १२ या वेळेत गायक शुभंम निरभणे यांचे प्रमुख उपस्थितीत श्री नवनाथ महाराज यांच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तानी या प्रसंगी उपस्थित राहुन या नाम यज्ञाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त नाथ भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे

## थोडक्यात...

### प्रशांत कोरटकरला न्यायालयाचा दणका, जामीन अर्ज फेटाळला

कोल्हापूर : इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत धमकी प्रकरणी आणि छत्रपती शिवरायांची बदनामी केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाने हा निर्णय सुनावला आहे. दिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. त्यामुळे कोरटकरचा आता कोल्हापुरातील मुक्काम वाढणार आहे.

चौथे सह दिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांच्यासमोर सुनावणी पार पडली. यावेळी प्रशांत कोरटकरला व्हिसीद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. तर त्याचे वकील सौरभ घाग यांनी देखील व्हिसीद्वारे न्यायालयात युक्तिवाद केला. इंद्रजीत सावंतांचे वकील असीम सरोदे यांनीही व्हिसीद्वारे युक्तिवाद केला. तर सरकारी वकील न्यायालयात उपस्थित होते. तिन्ही पक्षांकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. आरोपी प्रशांत कोरटकरचे वकील म्हणाले, '१२ वाजता फोन आला असे फिर्यादीचं म्हणणं आहे आणि रात्री ३ वाजता ते फेसबुकवर पोस्ट टाकली होती.

# सरपंच वनिता सुरवसे यांना राज्यस्तरीय प्रभात नारी पुरस्कार प्रदान

## पद्मश्री बीजमाता राहिबाई पोपेरे यांच्या हस्ते सरपंच सुरवसे यांचा सुपरवूमन म्हणून गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : आपल्या अंगभूत गुणांच्या बळावर स्वत:च्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवत, स्वत:पुरते मर्यादित न राहता समाजासाठी कार्य करणाऱ्या आणि सर्वांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या कर्तृत्ववान महिलांचा हृद्य सन्मान सोहळा सोमवारी सायंकाळी बालगंधर्व रंगमंदिरात रंगला. वास्तवाशी भिडणाऱ्या कर्तृत्ववान तेजस्विनींच्या कार्याने सर्व सभागृह रोमांचित झाले. दैनिक प्रभातचा चौथा नारी सन्मान २०२५ हा सोहळा मोठ्या दिमाखात, थाटात आणि उत्साहात संपन्न झाला.






**दै. प्रभातच्या नारी सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे, नगरविकास आणि सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दैनिक प्रभातच्या संचालिका वृषाली गांधी यांच्या हस्ते गोगावच्या सरपंच सौ.वनिता मधुकर सुरवसे यांना (सुपरवूमन) म्हणून राज्यस्तरीय नारी सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.**

दरम्यान, समाजात काम करताना आपली शाबासकी रुपाने पाठीवर पडलेली आपली कौतुकाची थाप ही आम्हाला उर्जा देणारी आहे. दैनिक प्रभात आयोजित केलेला हा सन्मान सोहळा आम्हाला नवी प्रेरणा देणारा, जबाबदारीची जाणीव करुन देणारा आहे, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी केली. यासोबतच उद्योग, व्यवसाय, शिक्षणसंस्था, कृषी क्षेत्रात आपल्या वेगळ्या संकल्पनेने समाजातील आपल्यासारख्याच महिलांसमोर, एक वेगळी आदर्श अशी पायवाट घालून देणाऱ्या राज्यातील कर्तृत्ववान महिलांचा (सुपरवूमन) सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यासाठी दैनिक प्रभात यांचे मनस्वी आभार मानले आणि ज्यांच्यामुळे मला पुरस्कार मिळाला ते आमच्या आदरणीय लोकप्रिय आमदार माननीय सचिन दादा कल्याणशेट्टी, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय दत्ताभाऊ काकडे, उपाध्यक्ष एडवोकेट विकास जाधव साहेब, व गावातील माझे सहकारी बंधू यांचेही सरपंच सुरवसे यांनी मनापासून आभार व्यक्त केले आहे.

प्रतिकूल परिस्थितीशी सामोरे जात असताना, प्रवाहाविरोधात जाण्याची धमक, सामाजिक परिवर्तन घडवण्याची शक्ती आणि समुदायापुरती असणारी आत्मियता असे अनेक गुण अंगी बाणवणाऱ्या महिलांचा यथोचित सन्मान यावेळी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात करण्यात आला. त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी संपूर्ण राज्यातून विविध क्षेत्रातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन चित्रा खरे यांनी केले, तर श्रीनिवास वारुंजीकर यांनी आभार मानले.

# बसवराज कुंभार यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील कसगी येथील श्री सिद्धेश्वर विद्यालय येथील बसवराज शंकरराव कुंभार यांचे ३५ वर्ष अखंडसेवा झाली यानिम्मित सत्कार निरोप समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शिक्षणा संस्थेचे अध्यक्ष श्री विठ्ठलराव बदोले, संस्थेचे अध्यक्ष श्री विठ्ठलराव पटणे, उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत, ज्येष्ठ संचालक रामराव मोरे, भीमाशंकर नंदर्गे, भीमाशंकर बोरुटे, विश्वनाथ नंदर्गे विनय बदोले, गावातील बसवराज चनपटणे, सेवानिवृत्त शिक्षक बसवराज हिरेमठ, सेवानिवृत्त क्लार्क मल्लिकार्जुन कलशेट्टी, कोथळी शाळेचे मा.मुख्याध्यापक राजेंद्र गुरव, सुभान चव्हाण, त्यांच्या उपस्थितीत संस्थेकडून भरती आहेर भेटवस्तू देऊन सेवेचा गौरव करण्यात आला. सन १९९० साली बसवराज कुंभार सेवक म्हणून शाळेत रुजू झाले. त्यांच्या कुशल कार्याच्या संस्थेने दखल घेऊन सेवक पदावरून बढती लॅब असिस्टंट ज्युनिअर क्लर्क सीनियर क्लार्क आणि रिटायरमेंट होताना. संस्थेचे संचालक पदावरती काम करण्याची संधी संस्थेने उपलब्ध करून दिली. अशी दुर्मिळ घटना देशाचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यानंतर बसवराज कुंभार यांच्या कार्याचा कामावरील निष्ठेचा, विद्यार्थ्यांच्या हिताचा, शाळा, संस्था, विषय असलेली कामाप्रतीची आत्मीयता कुंभार यांच्या पदाच्या चढत्या पायऱ्या मिळत गेल्या आणि ते कामाच्या निष्ठेने करत गेले. असे कर्मचारी संस्थेला मिळणे आमचे भाग्य आहे असे गौरव उदगार विठ्ठलराव बदोले यांनी आपल्या मनोगत आतून बसवराज कुंभार यांचे गौरव केले. यावेळी शाळेकडून मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे आणि सर्व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून मायेची शान फेटा देऊन सत्कार करण्यात आला. स्वातंत्र्यसेनानी चंद्रशेखर बदोले उच्च माध्यमिक विद्यालय कडून प्रा अरुण काडरामे यांचे सहकारी यांच्या कडून सत्कार करण्यात आला. सिद्धेश्वर विद्यालय शिक्षकांची पतसंस्था यांच्याकडून भाऊसाहेब पाटील यांच्याकडून शाल श्रीफळ फेटा देऊन सत्कार करण्यात आला. राजेंद्र गुरव यांच्या कडून भरती आहेर देऊन सत्कार करण्यात आला. वस्तीगृहातील विद्यार्थीकडून भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या प्रत्येक वर्गाकडून वर्ग प्रतिनिधी अनेक भेटवस्तू देऊ सत्कार करण्यात आला. या सर्व कार्यक्रमाचा कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोपात बदोले, कार्यक्रमासाठी झटणाऱ्या विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उगाव येथे सामूहिक गुढीपूजन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील उगाव येथे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने सामूहिक गुढी पूजन सोहळा आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी सामूहिक गुरुपूजन व हिंदू राष्ट्राची प्रतिज्ञा व सामुदायिक गुडी पुजन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने. हिंदू राष्ट्राची प्रतिज्ञ घेण्यात आली.

सामूहिक गुढीपूजन महंत १०८ श्री जनेश्वरनंदन गिरीजी महाराज, भारत माता आश्रम यांच्या हस्ते सामूहिक गुढी पूजन करण्यात आले. यावेळी महाराजांनी हिंदू धर्माचे महानता या संदर्भात उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

यावेळी सर्व ग्रामस्थांनी.देव देश धर्म, तसेच मंदिर, गोमाता यांच्या रक्षण करण्या संदर्भात प्रतिज्ञा घेण्यात आली. अतिशय भावपूर्ण वातावरणात सदर कार्यक्रम संपन्न झाला.

# दुधनी नगरपरिषदेत अतिक्रमण कारवाई, विक्रेते बेरोजगार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : केंद्र सरकार पथविक्रेत्यांसाठी योजना आणत असताना, दुधनी नगरपरिषदेने मात्र मनमानी कारभार सुरू केला आहे. मुख्य अधिकारी रमाकांत ढाके यांनी जेसीबी आणि पोलिस फौजफाट्यासह अतिक्रमण हटवण्याची कारवाई केली. या कारवाईत अनेक पथविक्रेत्यांना नोटीस न देता अतिक्रमण काढण्यात आले, त्यामुळे अनेक जण बेरोजगार झाले आहेत.

या कारवाईत अनेक लहान व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अतिक्रमण हटवण्यापूर्वी नगरपरिषदेने त्यांना कोणतीही पूर्वसूचना दिली नाही. तसेच, त्यांच्या पुनर्वसनासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे या व्यावसायिकांमध्ये नगरपरिषदेच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे.

अनेक दिवसांपासून हे व्यावसायिक आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दुधनी शहरातील परिसरात व्यवसाय करत होते. मात्र, नगरपरिषदेच्या या कारवाईमुळे त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

या कारवाईमुळे दुधनी नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. केंद्र सरकारच्या पथविक्रेत्यांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी न करता, नगरपरिषद मनमानी कारभार करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

# हभप गुरूवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांचे हरि किर्तन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लोहा/प्रतिनिधी : शहरातील लक्ष्मीराज सुपरमार्केट स्टेट बँकेच्या पाठीमागे माऊली निवास नवीन वास्तूच्या गृहप्रवेश कार्यक्रमानिमित्त हभप गुरूवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांचे हरि किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.(०३) एप्रिल २०२५ मिती चैत्र कृ.६ शके १९४७ रोजी गुरूवारी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत माऊली निवास हभप गुरूवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांचे हरि किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.नंतर लगेच महाप्रसाद होणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत नरसिंह बच्चेवार यांनी केले आहे.

# अक्कलकोट रिपाइं आठवले गटच्या इब्राहिमपूर शाखेचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील इब्राहिम्पूर येथे रिपाइं(आठवले गट)च्या नूतन शाखा ता.अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आली आहे.




या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी हे होते. याप्रसंगी युवक ता अध्यक्ष अप्पा भालेराव, युवक जिल्हा सरचिटणीस विजय पोतेनवरु, शहर अध्यक्ष अजय मुकणार, शुभम मडिखांबे, ता उपाध्यक्ष रमेश बनसोडे, कृष्णा धोडमनी, दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, भोसगेचे शाखाध्यक्ष मलकण्णा सोनकांबळे, बबलादचे सरपंच बाबुराव निरगुडे, बसवराज गायकवाड, आंदेवाडी चे सरपंच रमेश धोडमनी विकास नागोरे, नूतन शाखाध्यक्ष बाबू दत्ता बनसोडे, उपाध्यक्ष सतिश बनसोडे, खजिनदार रवि गायकवाड, सचिव अजय बनसोडे, कार्याध्यक्ष चौडप्पा गायकवाड, सेक्रेटरी, साखर साबणे, कोषाध्यक्ष अभिजित बनसोडे, सरचिटणीस शिवाजी गायकवाड, नागेश बनसोडे सह संगोगी(ब), तोळणूर, दुधनी, आंदेवाडी, मुगळी या गावातील कार्यकर्ते,गावातील प्रतिष्ठीत नागरीक मोठ्या संखेने उपस्थित होते. या वेळी अविनाश मडिखांबे, रमेश बनसोडे, विजय पोतेनवरु, सैदप्पा झळकी यांच्या समयोचित भाषणे झाली.

## उतारावरील मयत खातेदारांची नावे कमी करून त्यावर वारसाची नावे लागणार

# शेतकऱ्यांना मंगळवेढा तालुक्यात आज पासून जिवंत सातबारा मोहीम सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेतकऱ्यांना मंगळवेढा तालुक्यात आज पासून जिवंत सातबारा मोहीम सुरू, उतारावरील मयत खातेदारांची नावे कमी करून त्यावर वारसांची नावे लागणार कसे आहे प्रक्रिया?

अभिनंदन आज तहसीलदार मदन जाधव यांना महसूल विभागातील क्षेत्रीय स्तरातील उत्कृष्ट अधिकारी म्हणून पुरस्कार जाहीर.




शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा असणारा सातबारा उताऱ्यावरील मयत खातेदारांची नावे कमी करून त्यावर त्यांच्या वारसांची नावे लावण्यासाठी आजपासून मंगळवेढा तालुक्यात जिवंत सातबारा ही मोहीम राबवण्यात येणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय काढून ही मोहीम राज्यभर राबवण्यात बाबत सूचित करण्यात आले त्या अनुषंगाने मंगळवेढा तालुक्यात ८१ गावात आजपासून ही मोहिमेला सुरुवात झाली आहे.

वारस नोंदणी प्रक्रियेत बऱ्याच वेळ शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामना करावा लागत काही वेळा कोर्ट केसेस सुद्धा यात होतात आणि शेतकऱ्यांना नाहक मनस्ताप होतो या मोहिमेच्या निमित्ताने हा प्रकार राबवणार असून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

जिवंत सातबारा मोहिमेत अंतर्गत दिनांक एक ते पाच एप्रिल पर्यंत चावडी निहाय मयत खातेदारांची यादी तयार करून यादीचे चावडी वाचन केले जाईल व त्यानंतर दिनांक सहा ते वीस एप्रिल पर्यंत वारसांना आवश्यक कागदपत्रे घेऊन अर्ज करावा लागेल व दिनांक २१ एप्रिल ते दहा मे पर्यंत फेरफार प्रणाली अंतर्गत सातबारा उताऱ्यावर वारसाच्या नोंदी घेतली जाईल.

या मोहिमेत अर्ज सादर करताना शेतकऱ्यांना मयत व्यक्तीचा मृत्यू दाखला, रहिवासी पुरावा, वारस प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषित पत्र प्रतिज्ञापत्र, पोलीस पाटील, सरपंच किंवा ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसाच्या माहिती देणे ही आवश्यक राहील.

# सोलापूर जिल्ह्यातील खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. राज्यातील खेळाडूंनी ऑलिम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबध्द प्रयत्न होणे गरजेचे आहे. राज्यातील खेळाडूंसाठी अदयावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वेदकशास्त्र, क्रीडा स्पर्धाचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरिता करिअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी / विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मिशन लक्ष्यवेध या महत्वांकाक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या अॅथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग हॉकी लॉनटेनिस, रॉइंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, पेटलिटींग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकाराच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करण्या-या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अश्या संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरीचे गुणांकन करण्यात येऊन ३५ ते ५० गुण प्राप्त करणा-या संस्था क वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणा-या संस्था ब वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणा-या संस्था अ वर्ग अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. क वर्ग अकादमींना वार्षिक रु १०.०० लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रु २०.०० लक्ष व अ वर्ग अकादमींना वार्षिक रु ३०.०० लक्ष आर्थिक सहाय्य, पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे.

त्यानुसार इच्छूक संस्थांनी अधिक माहिती व अर्जाचे नमुन्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व सदर योजनेचा जास्तीत जास्त संस्थांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केलेले आहे.